# पोलीस स्टेशन जानेफळ

आज दिनांक 11/02/2025 रोजी पोलीस स्टेशन जानेफळ अंतर्गत असलेले ग्राम देऊळगाव साखरशा येथील सरस्वती कनिष्ठ महाविदयालय येथे नवीन कायदेविषयक कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेमध्ये भारतीय न्याय संहिता- 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम, 2023 यातील कायदेशीर तरतुदी, I.T. Act मधील तरतुदी, तसेच सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर व महिला संबंधी घडणारे अपराधाया संबंधाने घ्यावयाची दक्षता , अनुसुचीत जाती जमाती अधिनियम, अ.प्र.का. सुधारणा कायदा ,सायबर क्राईम, लैंगीक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम, दारुबंदी अधिनियम बाबत सविस्तर माहिती देवुन जनजागृती करण्यात आली.

सध्या समाजामध्ये सोशल मीडिया व इतर प्रसार माध्यमांद्वारे सुरू असलेल्या अराजकतेबाबत सतर्क राहणे, सायबर क्राईम मध्ये आरोपींच्या फसवणुकीच्या पध्दती, अशा घटनांपासून स्वतःचा बचाव करणे याबाबत विधीतज्ञ श्री.अमित वानखेडे, पो.स्टे.जानेफळ ठाणेदार श्री.अजिनाथ मोरे साहेब यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये महाविदयालयाचे शिक्षक, विदयार्थी पोलीस पाटील,सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष व गावातील प्रतिष्ठीत नागरीक हजर होते.


बुलढाणा जिल्हा पोलीस दल